## प्रकरण दुसरे

# अनुबंध कसोटी

# प्रकरण दुसरे - अनुबंध कसोटी


२.१ प्रस्तावना.

२.२ वेगळी मुद्दा चाचणी तंत्र.

२.३ अनुबंध चाचणीची वैशिष्टये.

२.४ अनुबंध चाचणीचे सुरुवातीचे कार्य.

२.५ पध्दती.

२.६ रिक्त स्थानाची निश्चिती करणे.

२.७ उताऱ्याची काठिण्य पातळी.

२.८ गुणदान योजना.

२.९ विकास.

२.१० समारोप.

## २.१ प्रस्तावना

गेली अनेक वर्षे इंग्रजीच्या अध्यापनासाठी भाषांतर पध्दतीचा वापर केला जात असे. परंतु सध्या प्रत्यक्ष पध्दती (Direct Method) वापरली जाते. आपली परीक्षा पध्दती आणि आपण वापरत असलेली परंपरागत चाचणी तंत्रे उदा. संक्षिप्त टीपा, स्पष्टीकरणे, अवतरणे इ. ही इंग्रजी अध्ययन/अध्यापनाच्या बदलत्या संदर्भात कालबाहय ठरली आहेत. हया चाचण्या विश्वसनीय तर नाहीतच शिवाय वैधही नाहीत. कारण त्या चाचणीतून स्थिर निकाल मिळत नाही. इतकेच नव्हे तर त्या चाचण्या ज्याची चाचणी घ्यावयाची आहे त्यासाठीही उपयुक्त नाहीत. त्या विद्यार्थ्यांच्या भाषिक संपादणुकीऐवजी पाठांतर, स्मरणशक्तीची चाचणी घेतात. जर त्यांनी पाठांतर केलेले परीक्षेमध्ये आले तर ते चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतात. जर आले नाही तर पुन्हा प्रयत्न करतात. त्यांच्या परीक्षेतील चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यातून त्यांच्यातील निश्चित भाषिक कुवत सूचित होत नाही.

## २.२ वेगळी मुद्दा चाचणी तंत्र

संशोधकांनी परंपरागत परीक्षा पध्दतीवर मात करण्यासाठी विपुल कार्य केलेले आहे. त्यांचे भाषिक कौशल्य अत्यंत अचूक व विशिष्ट मोजमाप करण्याचे प्रयत्न त्यातील काहींनी सुचविलेले चाचण्यांचे प्रकार हेलकावणाऱ्या दोलकाप्रमाणे दुसऱ्या टोकाला जातात. संरचनावादी असे मानतात की, भाषिक कौशल्ये ही वेगवेगळया मुद्द्यांमध्ये विभागून तपासता येतात. उदा. उपपदे, उभयान्वयी अव्यये, काळाचा अनुक्रम वगैरे वेगळया वाक्याद्वारे वेगळया पध्दतीने तपासले जातात. यात निबंधवजा प्रश्नांमध्ये असणाऱ्या कमतरतांवर मात केली जाऊ शकते. असे की, याठिकाणी कोणताही विशिष्ट व्याकरणाचा मुद्दा गाळला जाण्याची शक्यता नसते.

ही वेगळी मुद्दा चाचणी तंत्र विद्यार्थ्यांच्या बाबतीत विशिष्ट कौशल्य प्राप्त करण्याची खात्री सुध्दा देत नाहीत. इ. १० वी व १२ वी च्या परीक्षेमध्ये वेगळा मुद्दा घटकाप्रमाणे व्याकरणातील प्रश्नांमध्ये चांगले गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर प्रश्नामध्ये चांगले गुण मिळतीलच याची खात्री देता येत नाही. इतकेच नव्हेतर असे दिसून येते की, जे विद्यार्थी व्याकरणावरील प्रश्नांची अचूक उत्तरे देतात ते मुक्त लेखन प्रकारच्या प्रश्नांची स्वतःची उत्तरे देण्यास असमर्थ असतात. कारण वस्तुनिष्ठ चाचण्या कितीही चांगल्या असल्या तरी त्या अक्रियाशील चाचण्या असतात. कित्येक वेळेला पर्याय हे मर्यादितच असतात. आणि क्लुप्त्या ह्या वरवरपणे दिलेल्या असतात. त्यामुळे बहुधा विद्यार्थी यांत्रिकपणे अचूक प्रतिसाद देतात.

## २.३ अनुबंध चाचणीची वैशिष्टये

भाषिक कौशल्ये ही कोणत्याही परिस्थितीत फक्त अक्रियाशील कौशल्ये नसतात. इतकेच नव्हे तर ती एकमेकांपासून अलग करुन साध्य करता येत नाहीत तर ती संकलितरित्या वापरण्याकरिता दिली पाहिजेत. भाषिक कौशल्ये साहचर्यवादी व क्रियाशील असतात. ज्यांची चाचणी करावयाची आहे ते भाषेचे वेगवेगळे कापलेले मृतप्राय तुकडे समजून ते भाषिक संरचनेपासून वेगळे काढून तपासायचे नाहीत तर ती भाषिक कार्याचा एकचएक जाड तुकडा आहे. संपूर्ण भाषेचा एकच विभाग आहे म्हणून तपासले पाहिजे. हेच अत्यंत वस्तुनिष्ठरित्या अनुबंध प्रक्रियेद्वारा करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

यापेक्षा अधिक शब्दसंग्रहाच्या चाचणीचा गंभीर विचारच केलेला नाही. संरचनावादाच्या प्रभावामुळे वाक्यरचना ह्याच भाषिक अध्ययन व चाचणीचा भार बनलेल्या आहेत. शब्द हे फक्त वाक्यांच्या मध्ये वापरावयाचे इतकेच नव्हे तर अर्थपूर्ण शब्दांशिवाय वाक्यरचना करावयाची असे घडत असे. परिणामी शब्दसंग्रह तपासणी गौण ठरत असे.

वापरावयाचे इतकेच नव्हे तर अर्थपूर्ण शब्दांशिवाय वाक्यरचना करावयाची असे घडत असे. परिणामी शब्दसंग्रह तपासणी गौण ठरत असे.


शब्दसंग्रह चाचणीची वेगवेगळी साधने बहुधा ओळखा पाहू प्रकारची असतात. ते शब्दसंग्रह प्रकार हे संवादाच्या प्रभावाप्रमाणे सलग लिखाणाचा भाग म्हणून येत असतात. आणि त्याठिकाणी त्याच मुद्दयांकडे वरवरपणे पाहिले जात असे. अनुबंध प्रक्रियेमधून या मर्यादेवर मात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.


## २.४ अनुबंध चाचणीचे सुरुवातीचे कार्य

इ.स.१९७३ मध्ये विल्सन टेलर यांनी गद्याच्या उताऱ्याच्या वाचनीयतेचे मूल्यमापन करण्याचे वस्तुनिष्ठ साधन म्हणून अनुबंध हा शब्द वापरला. शब्द स्वैररित्या वगळले आणि ते भरण्याकरिता प्रयोज्यांना सांगण्यात आले. सरासरी गुणांवरुन किंवा यशस्वीयतेची पातळी ही त्या उताऱ्याच्या सहजतेचे सूचक म्हणून वापरले जात असे.

टेलरची अनुबंध घटकाची मूळ कल्पना गेस्टॉल्टच्या रिक्त जागा भरण्याच्या मानवी मनाच्या नैसर्गिक वृत्तीवर आधारित आहे. अनुबंध तंत्रामध्ये तर्क अंदाज केला जातो. निवडलेल्या उताऱ्यातील वेगवेगळया शब्दांच्या जागी परिक्षार्थीने शब्द भरुन त्या उताऱ्याला अर्थ प्राप्त करुन दयायचा असतो. हे एक विशेष कौशल्य असते. गेस्टॉल्टच्या मानसशास्त्रीय सिध्दांतानुसार मानवी मन हे वस्तूंच्या संपूर्ण अवबोधातील रिकाम्या जागा भरुन पूर्ण होत असते. ॲंडरसन (इ.स.१९७१) याने विस्कळीत वर्तुळ व त्रिकोणाच्या सहाय्याने असे सिध्द केले आहे की, अनेक लोकांना असे त्रिकोण किंवा वर्तुळ अपूर्ण असले तरी पूर्ण दिसते.

उदा.





आपल्याला याठिकाणी माहित आहे की, वरील त्रिकोण किंवा वर्तुळ पूर्ण नाही. तरीसुध्दा टिंबाटिंबांनी दर्शविलेल्या काल्पनिक रेषेवरुन आपल्याला पूर्ण त्रिकोण किंवा पूर्ण वर्तुळाचा अवबोध होतो. हे मानवी कल्पनाशक्ती व यामध्ये पुढेमागे पुरविलेल्या रिकाम्या जागांमुळे ते शक्य होते. याचा वापर भाषा दळणवळणात केला तर भाषा दळणवळणाने केलेले खंड हे अनुबंध चाचणी घटक म्हणून तयार केलेले असतात. खाली दिलेले दळणवळणाचे मॉडेल (नमुना) हे दाखवून देते

संदेशक — माध्यम — ग्राहक

लेखक/वक्ता → छापील साहित्य/बोललेले शब्द → वाचक/श्रोता

↓

बोलण्याची पध्दत
सांकेतिकीकरण
संदेशाची काटछाट

दळणवळण प्रक्रियेमध्ये प्रेषक हा महत्वाचा घटक आहे. तो माहितीचे संकलन, सुसुत्रीकरण, सांकेतिकीकरण आणि प्रक्षेपण करत असतो. प्रेषकाने पाठविलेला संदेश ग्राहकाकडे जावयाचा असल्याने हा संदेश अर्थपूर्ण व कमी वेळात दिला जाणारा असावा. त्यादृष्टीने माध्यमालाही महत्त्व प्राप्त होते. कारण हा संदेश पोहचविण्याचे कार्य माध्यमाला करावयाचे असते. दळणवळण प्रक्रियेतील आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे ग्राहक होय. प्रेषकाने पाठविलेल्या संदेशाचे निःसांकेतिकीकरण करणे, त्या संदेशाचा अर्थ लावणे त्यानुसार प्रेषकाकडे परत संदेश पाठविणे अशी अनेकविध कार्ये ग्राहकाला करावी लागतात.

दळणवळण जर प्रभावीपणे व्हावयाचे असेल तर प्रेषक, संदेश, माध्यम, ग्राहक हे चारही घटक अत्यंत कार्यक्षम असणे आवश्यक असते.

भाषा दळणवळण मॉडेलमध्ये संदेश देणारा लेखक किंवा वक्ता संदेश निर्माण करतो. त्यावेळी वक्त्याच्या आवाजाचा परिणाम होऊन संदेश

ग्राहकांपर्यन्त पोहचू शकत नाही व ग्रहणकृतीत अडथळा येतो. संदेशाची काटछाट विचारात घेऊन ग्राहक संदेशाचा अर्थ लावत असतो. काटछाट केलेली भाषा तयार करावयाची असते. त्याठिकाणी त्या शब्दाजवळचा शब्द वाक्यात भरणे आवश्यक असते व वाक्यरचना पूर्ण करावयाची असते.

टेलर विदित करतो की, पाठयांश स्वैर शब्द वगळून दिल्यानंतर प्रयोज्य त्याच्या विचारानुसार मोठया प्रमाणावर शब्दांची पूर्तता करतो आणि अर्थातच तो उतारा वाचकास सुबोध वाटतो.

## २.६ पध्दती - सुयोग्य उताऱ्याची निवड

अनुबंध पध्दतीद्वारे वाचन व लेखन कौशल्याची चाचणी घेता येते. ऐकणाऱ्याचे कौशल्य सुध्दा या पध्दतीच्या चाचणीद्वारा तपासता येते. ज्यामध्ये प्रयोज्यांकरीता दिलेल्या उताऱ्यातील काही शब्दांचे उच्चार न करता तो उतारा वाचला जातो. जर प्रयोज्याने तो उतारा अत्यंत व्यवस्थितरित्या ऐकला व समजावून घेतला तर तो प्रयोज्य न उच्चारलेल्या शब्दांचा अचूकरित्या अंदाज करु शकतो.

उतारा हा सलगता असणारा योग्य लांबीचा व योग्य काठिण्यपातळीचा असावा. हया उताऱ्यातील पहिले व शेवटचे वाक्य हे पूर्ण असले पाहिजे. शक्य असेल तर आपण मोठी सुरुवात व मोठा शेवट असणारा उतारा घेऊ शकतो. परंतू, एक गोष्ट अत्यंत महत्वाची आहे की, कमीत कमी पहिले व शेवटचे वाक्य हे कोणत्याही प्रकारची मोडतोड न करता जसे आहे तसेच वापरले पाहिजे. दुसऱ्या वाक्यापासून ठराविक क्रम निश्चित केलेला शब्द वगळावा आणि रिकाम्या जागा ठेवण्याची ही पध्दती शेवटपर्यन्त ठेवावी. हा रिक्त शब्द कदाचित आशयशब्द किंवा रचना शब्द हयाप्रकारचा असू शकेल. उपपदापासून ते नामांपर्यन्त विद्यार्थ्याने हा उतारा सर्व क्लुप्त्या व वाक्यरचनेतील विचाराधीनता लक्षात घेऊन अत्यंत काळजीपूर्वक वाचला पाहिजे आणि संदर्भानुसार विचार करुन सुयोग्य शब्दांनी रिकाम्या जागा भराव्यात.

याबाबतीत काही विचार असे आहेत की, प्रत्येक शब्दाची लांबी सारखीच असली पाहिजे किंवा कमी जास्त असली तरी चालते. जर तशी नसेल तर छायांकित प्रति वापरता येतात. हयामधून वाचकास मोठया प्रमाणावर अशाब्दिक माहिती उदा. चित्रे, आकृत्या वगैरे वापरता येते. वाचनीयता अभ्यासामध्ये पुर्नमुद्रित उताऱ्यांपेक्षा अधिक चांगले निर्णय मिळतात.

टेलरने सुरुवातीला लेखकाने मूळ उताऱ्यात वापरलेल्या शब्दांच्या समानार्थी शब्दांचा वापर केला. त्याने त्याची गुणदान योजना करताना व्यक्तीनिष्ठपणाची शंका गृहित धरली होती आणि ज्याठिकाणी अचूक शब्दाची अपेक्षा असते त्या व्यतिरिक्त इतर शब्द स्वीकारले तर त्याचा फायदा कमी होतो.

हया ठिकाणी दोन नमुनेदार घटक वाचकाच्या मानसिक प्रक्रियेत कार्य पार पाडतात. १) अर्थ नमुना २) वाक्य नमुना

अर्थनमुना हा आपण दिलेल्या विभागाशी किती चांगल्या पध्दतीने व कोणत्या पातळीवर परिचित आहे. या तत्वानुसार कार्य करतो यावरुन आपल्याला प्रतिसादकाची मानसिक परिपक्वता व सांस्कृतिक जडणघडण स्पष्ट केली जाते. योग्य शब्दयोजना केली जात असेल तर दिलेला उतारा त्याच्या/तिच्या शिकलेल्या घटकाच्या पातळीशी सांधा साधू शकत असेल तर त्याला/तिला शब्दसंग्रहाचा पुरेसा नियंत्रित वापर करता येतो व त्यातून योग्य शब्द निवडता येतो. उताऱ्याच्या संभाषणाच्या पातळीशी योग्य पर्याय निवडले हे प्रतिसादकाच्या मानसिक, सांस्कृतिक व शब्दसंग्रहावर अवलंबून असते. अशा प्रकारे योग्य शब्द घटकाची निर्मिती ही प्रतिसादकाच्या शब्दसंग्रहाची वस्तुनिष्ठ योजना चाचणी असते. रिकाम्या जागी चपखलपणे बसणाऱ्या आशय शब्दांचा एकमेकांशी संबंध असतो.

वाक्यरचना ही आपले व्याकरणाच्या नियमांवर कितपत प्रभुत्व आहे व शिकावयाच्या भाषेतील मान्यताप्राप्त रुढ काय आहेत? या तत्वावर

कार्य करत असते. याठिकाणी चपखलपणे बसणाऱ्या शब्दांचे वाक्यरचनेतील साम्य हे एकमेकांशी संबंधित असते.

गद्य पाठाची वाचनीयता तपासण्याकरिता सन १९५३ मध्ये W.Y.Taylor यांनी अनुबंध चाचणी तयार केली आहे. म्हणजेच रिकाम्या जागी मूळ भाषिक वक्त्याच्या कुवतीप्रमाणे जागा भरण्याची चाचणी म्हणजेच भाषेचा नैसर्गिकपणा तपासणे होय. नंतर हीच चाचणी वाचन, आकलन व संपूर्ण भाषिक कुवत तपासण्याच्या कामी महत्वाची बनली.

## २.६ रिक्त स्थानाची निश्चिती करणे

अनुबंध चाचणीची रचना करताना प्रत्येक ठराविक क्रम निश्चित केलेला शब्द वगळावा लागतो. रिक्त स्थानाची किंमत काय असू शकेल? हे स्वाभाविक आहे की आशयशब्द आणि रचनाशब्द ह्यांची समानसंधी प्राप्त झाली पाहिजे अशा पध्दतीने रिक्त स्थानाची किंमत ही अट समाधानकारकरित्या पूर्ण करणारी हवी म्हणून पाचपेक्षा कमी अंतराचा शब्द किंवा दहानंतरचा शब्द वगळणे हे चाचणी रचना करताना अव्यवहार्य ठरते म्हणून कोणीही ७ ते १० च्या मर्यादेतील शब्द वगळण्याचा ढाचा वापरु शकतो. रिक्त स्थानाची योग्य ती किंमत काढण्याकरिता अनेक संशोधकांनी प्रयत्न केलेले आहेत. परंतु, भाषिक वर्तनाकरिता निश्चित अशी एक किंवा एकच किंमत त्यातून काढू शकलेले नाहीत. जसे आपण घटक हे वगळण्याकरिता येत नाही तर ७ ते १० च्या मर्यादेतील हा रिक्त शब्द समान यादृच्छिक पध्दतीने निवडत असतो. तथापि, सातवा शब्द वगळणे हे संशोधनाने मान्य केलेले आहे.

जर एखादेवेळी रिकाम्या जागेत एखादे नाम अथवा संख्या येत असेल. ज्यासाठी कोणताही तर्क अथवा पर्याय मिळू शकत नसेल तर

अशावेळी ही रिकामी जागा पुढे ढकलली जाते. यालाच "रुपांतरित अनुबंध" असे म्हणतात.

## २.७ उताऱ्याची काठिण्य पातळी

उताऱ्याची काठिण्य पातळी निश्चित करण्यासाठी ठराविक सुत्रांचा वापर करावा लागतो. पण प्रत्यक्षात मात्र वर्गाध्यापनात अध्यापकाच्या ज्ञानाच्या पातळीवर अवलंबून असते. उतारा जास्त कठीण अथवा अगदीच सोपा असू नये एवढी खबरदारी घेतली पाहिजे. उताऱ्यामध्ये पुरेसे आव्हान असले पाहिजे.

अनुबंध कसोटीकरिता उतारा निवडत असताना प्रयोज्याने अभ्यासलेल्या क्रमिक पुस्तकांच्या काठिण्य पातळीच्या खालचा उतारा असावा. अनावश्यकता हे भाषेचे एक वैशिष्टय आहे. त्यामुळे सोपे आणि सरळ लिखाण असणारा उतारा हा किचकट व क्लिष्ट लिखाण शैली असणाऱ्या उताऱ्यापेक्षा कठीण असतो. म्हणूनच उतारा निवडल्यानंतर तो एका नमुना गटाला देऊन त्याची उपयुक्तता निश्चित झाली तरच तो प्रयोज्यांना दयावा.

## २.८ गुणदान योजना

अनुबंध कसोटी ही भाषिक कौशल्याची वस्तुनिष्ठ चाचणी आहे. कारण या चाचणीमध्ये विविधतेला किंवा व्यक्तीनिष्ठतेला वाव नाही. या गुणदान योजनेच्या दोन प्रक्रिया पुढीलप्रमाणे -

अ) कोणत्याही एका नेमक्या शब्दांचा व्याकरणाच्या दृष्टीने प्रकार.

ब) स्वीकारलेल्या कोणत्याही एका योग्य संदर्भीय शब्दाचा व्याकरणदृष्टया प्रकार.

हया प्रकाराची परिपूर्णता पाहण्यासाठी एखादा उच्च दर्जाचा शब्दकोष वापरता येतो की, ज्या शब्दांचा समानार्थी शब्द मिळू शकतो. तरीसुध्दा

व्यवहारामध्ये प्रयोज्याचे स्वतःचे मन व्यवस्थित झाले पाहिजे. प्रयोज्याने मूळ शब्दाच्या जवळ जाणाऱ्या शब्दाचा अर्थ निवडला पाहिजे.

<u>गुणदान योजना पुढीलप्रमाणे</u> :-

१) अगदी बरोबर भरलेला शब्द जो त्या शब्दाचा योग्य निकष सांगू शकतो त्याला १ मार्क/गुण मिळेल. विद्यार्थ्याच्या शब्दरचनेबद्दल कोणत्याही प्रकारची शिक्षा केली जाणार नाही.

२) दुसरा कोणताही शब्द की जो व्याकरणदृष्टया स्वीकृत असेल, रचनेच्या दृष्टीने स्वीकृत असेल आणि त्या उताऱ्याला अनुसरुन असेल तर त्या विद्यार्थ्याला सुध्दा १ गुण मिळेल.

३) जर विद्यार्थ्यांनी वापरलेला शब्द वाक्यरचनेच्या दृष्टीने उपयुक्त असेल जर तो शब्द वाक्यातील रिकामी जागा भरण्यासाठी अर्थाच्या दृष्टीने परिपूर्ण असेल पण त्या उताऱ्याच्या दृष्टीने स्वीकृत नसेल आणि तो शब्द व्याकरणदृष्टया बरोबर असेल तर त्याला अर्धा गुण मिळेल.

४) एखादा शब्द जर व्याकरणदृष्टया, आशयानुसार किंवा दिलेल्या उताऱ्याच्या कोणत्याही प्रकारे परिपूर्ण नसेल तर त्याला गुण देता येणार नाहीत.

## २.९ विकास

या चाचणीच्या विकासाच्या प्रक्रियेकरिता दोन नावे महत्वाची आहेत. बॉम्युर्थ आणि रॅकीन. जॉन बॉम्युर्थ यांनी टेलरची मूळ उपपदाच्या संख्येसंबंधातील (इ.स.१९६०) ची पध्दती सुधारली. ही पध्दती वाचनीयता व वाचण्याची कुवत यांचे मूल्यमापनासाठी व विश्वासार्हता वाढविण्यास मदत करते. बॉम्युर्थ (इ.स.१९६९) यांनी अनुबंध चाचणी व तोंडी वाचन व बहुपर्यायी आकलन प्रश्न (ज्या अभ्यासामध्ये विव्हर व किंग्स्टन यांनी मांडलेल्या अनुबंध चाचणीमध्ये असलेला घटक इतर वाचनीय चाचणीमध्ये आढळत नाही.) यांच्या निर्णयाचा नातेबंध शोधून काढला. बॉम्युर्थ यांच्या

निष्कर्षामध्ये एक घटक याला अधिक किंमत असते आणि त्या घटकास वाचनीय आकलन कुवत यांच्या बाबतीत अत्यंत कमी अडचण असते. रॅकिन (इ.स.१९७७) याने त्यांच्या निबंधामध्ये दोन प्रकारामधील फरक स्पष्ट केला, रचनात्मक व भाषिक अनुबंध. रचनात्मक अनुबंध म्हणजे प्रत्येक ठराविक क्रम निश्चित केलेले शब्द वगळणे. त्याचा वापर टेलर बॉम्युर्थ यांनी केला. वगळलेले शब्द हे मुख्यतः दोन शब्दामधील नातेबंधाशी संबंधित असल्याने त्याला रचनात्मक अनुबंध हे नांव दिले. भाषिक अनुबंधामध्ये प्रत्येक "रिक्तस्थान" हे नाम किंवा क्रियापद (आणि काही वेळा विशेषण) वगळले जाते. ज्या शब्दांना एक व्यापक अर्थ असतो. रचनात्मक शब्द हा बंदिस्त शब्दांचा असतो व जे मूळचे रहिवाशी ओळखू शकतात. याउलट एका व्यक्तीला प्रत्येक नाम व क्रियापद लक्षात ठेवणे अत्यंत कठिण असते म्हणूनच भाषिक शब्दांपेक्षा रचनात्मक शब्द भरणे हे अत्यंत सोपे असते आणि ते मूळ लेखकाच्या पध्दतीने भरले जाऊ शकतात. रॅकिनला असे आढळून आले की, रचनात्मक अनुबंधाचा वाचनीयता कुवत व बुध्दिमत्ता यांच्याशी अधिक सहसंबंध आहे. याउलट भाषिक अनुबंध पूरक घटकांकरिता उपयुक्त ठरते.

अनुबंध संबंधीचे बहुतेक सर्व संशोधन हे इंग्रजीमध्ये झालेले आहे. परंतु इ.स.१९७२ पासून पुढे इतर भाषाकरिता ही पध्दती (विशेषतः फ्रेंच) वापरली जाऊ लागली.

एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात ही चाचणी रुपांतरित करण्यामध्ये चाचणीचा मूळ ढाचा टिकवून ठेवणे ही अत्यंत महत्वाची अडचण आहे. फ्रेंच भाषेमधील अनुबंध चाचणीत दुसऱ्या भाषेमधील अनुबंध चाचणीच्या वापराचा अभ्यास केला त्यातून साहित्याचा अभाव आढळून आला.

## २.१० समारोप

प्रस्तुत प्रकरणात 'अनुबंध कसोटीची' वैशिष्टये, वेगळी मुद्दा चाचणी तंत्र, कार्य, पध्दती, रिक्त स्थानाची निश्चिती, गुणदान योजना, विकास उताऱ्याची काठिण्य पातळी या बाबींचा ऊहापोह केलेला आहे. या प्रकरणाचा प्रस्तुत संशोधनास पार्श्वभूमीसारखा उपयोग होणार आहे.

पुढील प्रकरणामध्ये (प्रकरण तीन - संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा आढावा) अनुबंध कसोटीच्या संदर्भात प्रकाशित व संशोधित साहित्याचा मागोवा घेण्यात आलेला आहे.

# संदर्भसूची

1) E.L.T.C. - Correspondance Course in Modern Techniques of Testing and Evaluation, unit-5, "Testing Overall Language Ability." The Cloze Procedure, E.L.T. Centre, Shivaji University, Kolhapur (Memographed), 1988.

2) Gefen Raphael - "An Experiment with Cloze Testing" (E.L.T.,33.2, P.D. 122 - 126), 1979.

3) Shastri S. V. - "The Cloze Test As a measure of Language proficiency for India", (Journal of Shivaji University, Vol - 19), 1980.

4) Wainman H - "Cloze Testing of Second Language Learners" (E.L.T. Journel, 33.2, P.P. 126-132), 1979.